# प्रेस नोट

दिनांक २५/०७/२०२२

वाशिम जिल्हयातील नोकरी / रोजगार इच्छूक उमेदवारांना नोकरीच्या संधी प्राप्त व्हाव्यात या उद्देशाने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वाशिम या कार्यालयाव्दारे **दि. २२/०७/२०२२ ते २८/०७/२०२२ पर्यंतच्या कालावधीमध्ये ऑनलाईन रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.**

सदर मेळाव्यामध्ये १) टेक्नोक्राफ्ट फॅशन लिमीटेड अमरावती २) मटॅलेंट सेतु प्रा. लि.पुणे ३) वर्क फोर्स प्रा.लि.पूणे ४) रवि पाटील ट्रॅक्टर्स,वाशिम इत्यादी नामांकित कंपनी / उद्योगाकडील उद्योजक वा त्यांचे प्रतिनिधी मुलाखतीद्वारे नोकरी इच्छूक उमेदवारांना खाजगी नोकरी/रोजगार देण्यासाठी सहभागी होत आहे.

यासाठी १० वी, १२ वी, आय.टी.आय. (इलेक्ट्रॉनिक्स ट्रेड), पदवीधर (कला/वाणिज्य/विज्ञान), इंजिनिअरींग डिप्लोमा इ. शैक्षणीक पात्रता असणारे वयोमर्यादा - १८ ते ४५ मधील युवक-युवती उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येवून विविध प्रकारच्या पदनामांकरीता **१६०** संख्येपेक्षा जास्त रिक्तपदावर रोजगार मिळवण्याची संधी जिल्हयातील नोकरी इच्छुक उमेदवारांना याव्दारे प्राप्त होणार आहे.

त्या अनुषंगाने वाशिम जिल्हयातील रोजगार इच्छुक स्त्री/पुरुष उमेदवारांना www.mahaswayam.gov.in या वेबपोर्टल ऑनलाईन पध्दतीने विविध पदासाठी शैक्षणिक पात्रतेनुसार पसंतीक्रम दत सहभागी होता येणार आहे. ऑनलाईन रोजगार मेळाव्यामध्ये सहभागी होणा-या उमेदवारांना त्यांचेकडील सेवायोजन कार्ड च्या युझरनेम व पासवर्ड मधुन मेळाव्यात सहभागी होता येईल. असे आवाहन श्रीमती सुनंदा बजाज, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केन्द्र, वाशिम यांनी केले आहे.

सदर रोजगार मेळाव्यात ऑनलाईन पध्दतीने सहभागी होण्याची प्रक्रीया/ पध्दत खालीलप्रमाणे आहे.

१. यासाठी आपणाकडे एम्पॉयमेंट कार्डमधील युझरनेम व पासवर्ड असावे.
२. नसल्यास www.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवरील Job Seeker वरील Register वरुन युझरनेम व पासवर्ड मिळवावात्यानुसार सहभागी झालेल्या
३. त्यानंतर Job Seeker च्या विंडोमध्ये लॉगीन करुन डाव्या बाजुकडील पंडीत दीनदयाळ उपाध्याय जॉब फेअर वर क्लीक करावे
४. येथे आपणांस वाशिम जिल्हा निवडुन त्यातील WASHIM JOB FAIR- 1 मध्ये नमुद पात्रतेनुसारच्याय पदांवर अप्लाय करावे. त्यावेळी Applied असा मेसेज दिसेल.
५. या पध्दतीने आपण सदर ऑनलाईन मेळाव्यात सहभागी झालेले असाल.

**काही अडचन असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वाशिम यांचे दुरध्वनी क्र. ०७२५२-२३१४९४ वर संपर्क करावा.**

(सुनंदा बजाज)
सहायक आयुक्त
जिल्हा कौशल्य विकास रोजगार व
उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,वाशीम